आदिवासी प्रगती मंडळ तलासरी संचालित,

# कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, तलासरी

# PROSPECTUS

## प्रवेश माहिती पुस्तिका

## 2023-24



**Mob- Principal- 8007183970 Office- 9370418288**

**Mob- Admission-9260267080 Mob-Scholarship-9765512400**

## आदिवासी प्रगती मंडळ तलासरी संचालित,

## कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय तलासरी जिल्हा-पालघर

### प्रवेश प्रक्रिया

| सर्व प्रथम महाविद्यालयाचे online प्रवेश फॉर्म भरणे | |
|---|---|
| लिंक- | http://admission.cgspcollege.org.in किंवा http://cgspcollege.org.in वर ENROLL TODAY किंवा ADMISSION वर क्लिक करावे. |
| फॉर्म फी- | रु. १००/- |
| कृपया फॉर्म भरतांना संपुर्ण माहिती व्यवस्थीत भरल्याची खात्री करावी. | |
| फॉर्म भरतांना आपला पासवर्ड व्यवस्थित लक्षात ठेवावा. कोणत्याही प्रकारचे sms येणार नाही. आपण आपले लॉगीन करून नेहमी अपडेट घेत राहावे. व्हात्सप ग्रुप, नोटीस बोर्ड, महाविद्यालायाची http://cgspcollege.org.in या वेबसाईटचे नेहमी वाचन करावे व त्याचे पालन करावे. | |
| प्राचार्य- 8007183970 कार्यालय- 9370418288 | |
| महाविद्यालय प्रवेश CALL- 9260267080 | |
| शिष्यवृत्तीसाठी CALL- 9765512400 | |
| प्रवेशासाठी पात्र विद्यार्थांची यादी वेबसाईट वर वेळोवेळी प्रसिद्ध केली जाईल | |

सर्व विद्यार्थ्यांनी online प्रवेश घ्यावयाचा आहे तसेच online फी भरावयाची आहे. ज्यांना OFFLINE फी भरावयाची आहे त्यांच्यासाठी CHALLAN जनरेट होईल. त्याच चालनाद्वारे फी भरावयाची आहे.

सर्व विद्यर्ध्यांना ABC ID आवश्यक आहे.

ABC ID म्हणजे काय? याची माहिती नोटीस बोर्डवर स्वतंत्रपणे लावणेत आलेली आहे.

## अत्यंत महत्वाचे

विद्यार्थांसाठी महाविद्यालयाचे नोटीस बोर्ड, महाविद्यालयाची वेबसाईड, आपले मोबाईलवरील SMS, आपल्या ईमेलवर आलेला संदेश , आपल्या व्हाटस ॲप वरील संदेश, गुगल फॉर्म, गुगल क्लासरूम, टेलिग्राम, झूम ॲप, वेबिनार अशा जास्तीत जास्त ऑनलाईन माध्यमांच्या संपर्कात असणे आवश्यक आहे.

मला माहितच नाही अशा प्रकारची उत्तरे हे आपल्यासारख्या पदवीस्तरावरील शिक्षण घेणाऱ्या सुजाण विद्यार्थांनी देणे योग्य होणार नाही.

महाविद्यालयाचे कार्यालय, ग्रंथालय, संगणक कक्ष, प्रयोगशाळा, बोटनिकल गार्डन, वर्गखोल्या, व्हरांडा, पार्किंग, खेळाचे मैदान, हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची इमारत, इंग्लिश माध्यमाची शाळा, कँटीन तसेच आवारातील इतर कोणत्याही ठिकाणी अकारण जाऊ नये व गर्दी होणार नाही यांची कटाक्षाने काळजी घ्यावी.

प्रवेश माहिती:-

1 ) महाराष्ट्र शासन, मुंबई विद्यापीठ यांच्या नियमानुसार आणि मा. उच्चन्यायालयाच्या अटीनुसार तसेच वेळोवेळी होणाऱ्या बदलांच्या अधीन राहून जात प्रवर्गानुसार गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना पहिली, दुसरी व अंतिम गुणवत्ता यादीनुसार प्रवेश दिला जाईल. त्यासाठी वेळेचे बंधन राहील आणि दिलेल्या निर्धारित वेळेनंतर प्रवेशाचा हक्क राहणार नाही.

Check website for Merit List. गुणवत्ता यादीसाठी वेळोवेळी वेबसाईट पाहणे आवश्यक आहे याची विद्यार्थी व पालक यांनी नोंद घ्यावी.

2 ) प्रवेशासाठी पहिली गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल. दिलेल्या तारखेपर्यंत यादी ग्राह्य असेल. दिलेल्या तारखेनंतर गुणवत्ता यादीत नाव असूनही प्रवेश घेतला नसेल तर त्यास प्रवेशाची गरज नाही असे समजून दुसरी गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल.

3 ) प्रवेशासाठी दुसरी गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यात दिलेल्या तारखेपर्यन्त ती यादी ग्राह्य असेल. दिलेल्या तारखेनंतर गुणवत्ता यादीत नाव असूनही प्रवेश घेतला नाही तर त्यास प्रवेशाची गरज नाही असे समजून अंतिम व शेवटची गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल.

4 ) प्रवेशासाठी अंतिम व शेवटची गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यात दिलेल्या तारखेपर्यंत तीयादी ग्राह्य असेल दिलेल्या तारखेनंतर गुणवत्ता यादीत नाव असून प्रवेश घेतला नाही तर त्यास प्रवेशाची गरज नाही असे समजण्यात येईल.त्यानंतर प्रवेश प्रक्रिया संपुष्टात येईल.

5 ) प्रवेशासाठी रिक्त जागा असतील आणि मुंबई विद्यापीठाने प्रवेशासाठीची वेळ वाढवून दिल्यास उर्वरित विद्यार्थ्यांचा विचार केला जाईल.

प्रवेशासाठी नियम व अटी :-

1. द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आपली मागील परीक्षेची गुणपत्रिकेची सांक्षाकित केलेली छायांकित प्रत द्यावी .

2. कोणताही प्रवेश प्रवेश समिती व प्राचार्य यांच्या मान्यतेशिवाय तसेच महाविद्यालयाच्या आवश्यक त्या प्रवेश शुल्काशिवाय ग्राह्य धरला जाणार नाही.

3. महाराष्ट्र राज्य व्यतिरिक्त केंद्रशासित प्रदेश व इतर राज्यातील विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी पूर्ण फी भरावी लागेल.

4. महाविद्यालयाने दिलेल्या प्रवेश फक्त एक शैक्षणिक वर्षाइतकाच मर्यादित असून पुढील वर्षासाठी नवीन प्रवेश घ्यावा लागेल.

5. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास आपला प्रवेश रद्द करावयाचा असल्यास एक आठवडा अगोदर लेखी अर्ज करावा लागेल .

6. शिष्यवृत्तीत पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनी जातीचा मूळ दाखला, जात पडताळणी मूळ प्रमाणपत्र, उत्पन्नाचे मूळ प्रमाणपत्र कार्यालयात दाखवून शिष्यवृत्तीचा Online Form Submitted सादर करणे बंधनकारक राहील . तसे न केल्यास तो विद्यार्थी संपूर्ण वर्षाची फी स्वतःच भरणार आहे असे समजले जाईल.

7. नवीन धोरणानुसार आधार कार्डची झेरॉक्स जोडणे अनिवार्य आहे.

8. विद्यार्थ्याने एकदा निवडलेले विषय नंतर कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही त्यामुळे आपले विषय विचारपूर्वक निवडावेत

9. ज्या विद्यार्थ्याला / विद्यार्थिनीला मागील परीक्षेत सर्वात जास्त गुण प्राप्त असतील त्याच विद्यार्थ्यांना वर्गप्रतिनिधी म्हणून निवडलेले जाईल.

10. महाविद्यालयातील स्नेहसंमेलनात , बक्षिस वितरण समारंभात, स्वातंत्र दिन कार्यक्रमात व प्रजासत्ताकदिन कार्यक्रमात विद्यार्थ्यांची एकूण ८०% उपस्थिती अनीवार्य आहे.

11. महाविद्यालयामार्फत एक-दिवसीय शैक्षणिक  सहलीसाठी परवानगी दिली जाईल . एका दिवसापेक्षा अधिक दिवस शैक्षणिक सहलीचे आयोजन केले तर अशा सहलीसाठी फक्त रेल्वेने प्रवास करणे बंधनकारक असेल.

12. प्रवेश देण्याच्या व नाकारण्याचा सर्वस्वी अधिकार प्राचार्यांकडे राखीव राहील.

13. ज्या विद्यार्थ्यांच्या  वयाची १८ वर्षे पूर्ण झालेली असतील त्या विद्यार्थ्यांना मतदान नाव नोंदणी अर्ज भरणे अनीवार्य आहे .

<u>विद्यार्थी प्रवेश क्षमता</u> :-

| | | | |
|---|---|---|---|
| मराठी, इतिहास, राज्यशास्र - | एफ.वाय.बी.ए. (A) 120 | एस.वाय.बी.ए. (A) 120 | टी.वाय.बी.ए. (A) 120 |
| इंग्रजी, अर्थशास्र, माससशास्र - | एफ.वाय.बी.ए. (B) 120 | एस.वाय.बी.ए. (B) 120 | टी.वाय.बी.ए. (B) 120 |
| Accounts, Eco., Commerce | एफ.वाय.बी.कॉम.120 | एस.वाय.बी.कॉम.120 | टी.वाय.बी.कॉम.120 |
| CBZ and PCM Group- | एफ.वाय.बी.एस्सी.120 | एस.वाय.बी.एस्सी.120 | टी.वाय.बी.एस्सी.120 |
| विना अनुदानित - | एम.ए. इतिहास | प्रथमवर्ष-60 | एम.ए. दुसरेवर्ष-60 |
| विना अनुदानित - | एम.कॉम. आकौन्टसी | प्रथमवर्ष-60 | एम.कॉम. दुसरेवर्ष-60 |

<u>सर्वसाधारण नियम-</u>

- महाविद्यालयीन अध्यापनाची वेळ सकाळी ८.३० ते २.३० असेल व कार्यालयीन कामाची वेळ सकाळी 9 ते 5 असेल. सर्व लेक्चर संपल्यानंतरच विद्यार्थ्यांना कार्यालयात प्रवेश दिला जाईल याची सर्व विद्याथ्यांनी नोंद घ्यावी.
- शांतता राखावी व महाविद्यालयाची शिस्त पाळावी.

-प्रत्येक विद्यार्थ्याकडे स्वतः चा फोटो असणारे व प्राचार्यांची सही असणारे ओळखपत्र असणे आवश्यक आहे. महाविद्यालयाच्या अधिकार मंडळाला हे ओळखपत्र केव्हाही आणि कुठेही दाखविणे अनीवार्य राहील.

- प्रत्येक विद्यार्थ्यास महाविद्यालयाने नियोजन केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे तासिका , ट्युटोरिअल , प्रोजेक्ट ,परिसंवाद आणि तोंडी वलेखी परीक्षेला हजर राहणे अनिवार्य आहे. तसेच नियमित होणारे ऑनलाईन अद्यापनास हजर राहणे अनिवार्य राहील.
- महाविद्यालयाच्या वेळापत्रकात ठरविलेल्या तासिका आणि शैक्षणिक उपक्रमात कमीतकमी ८०% हजेरी अनिवार्य आहे. सदरच्या उपस्थितीचा आधारावर लेखीपरीक्षेस परवानगी मिळणार आहे. सदरची हजेरी वेळोवेळी ऑनलाईन शैक्षणिक कामासाठीही अनिवार्य राहील.
- महाविद्यालयीन वर्गात अध्ययन करतांना किंवा आवारात फिरताना आपल्यामुळे इतर वर्गातील विद्यार्थ्यांनाकोणताही त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांना एखादे प्रमाणपत्र किंवा शिफारस किंवा कागदपत्रावर प्राचार्यांची सही हवी असेल तर त्यासाठी कार्यालयात लेखी अर्ज करणे आवश्यक आहे.
- सर्व पालक व विद्यार्थी यांना प्राचार्यांना भेटण्यासाठीची वेळ सकाळी १२ ते १.३० अशी आहे विद्यार्थ्यांनी वर्ग चालू असतांना किंवा कोणताही कार्यक्रम चालू असतांना कार्यालयात येऊ नये. प्रथम वर्गातील अध्ययन किंवा कार्यक्रमाची सांगता करावी व नंतरच कार्यालयात यावे.

- कोणत्याही विद्यार्थ्याला आर्थिक सोयी-सुविधा शासनाच्या, विद्यापीठाच्या व संस्थेच्या नियम व अटीनुसार दिल्या जातील.

- महाविद्यालयीन व्यवस्थापन व शिस्त यांचा भंग होईल असे कोणतेही काम / कृत्य विद्यार्थ्याने महाविद्यालयात किंवा महाविद्यालयाच्या आवारात करू नये.

- प्राचार्याच्या परवानगी शिवाय कोणत्याही विद्यार्थ्याने सहलीसाठी किंवा इतर कामासाठी वर्गणी किंवा पैसेजमा करू नये. तसे केल्यास तो गैरप्रकार समजण्यात येईल व नियमाप्रमाणे त्यांच्यावर कार्यवाही होईल.

- महाविद्यालयीन संपत्ती किंवा मालमत्ता याची काळजी प्रत्येक विद्यार्थ्याने घेतली पाहिजे व त्याचप्रमाणे महाविद्यालयात जबाबदारीने वागले पाहिजे.

- विद्यार्थ्यांची वस्तू हरविल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच ज्या कोणालाही महाविद्यालयात किंवा आवारात एखादी वस्तू सापडली तर ती त्याने ताबडतोब महाविद्यालयाच्या काउंटरवर जमा करावी .

- एखाद्या प्रकरणाचा निकाल नियमात बसत नसेल तर योग्य - अयोग्यतेचा निर्णय हा सर्वस्वी प्राचार्य देतील व तो सर्वांनी मान्य करणे बंधनकारक राहील.

- सर्व विद्यार्थ्यांनी सूचना फलक नियमित पहावे. सूचना फलकात दिलेल्या सूचनांचे पालन करावे. कोविड 19 प्रादुर्भाव लक्षात घेता सदरचे सूचना फलक डिजिटल फॉर्म मध्येही उपलब्ध करुन देणेत आलेले आहे. तसेच महाविद्यालयाच्या बेबसाईडवर स्क्रीनवरही आहे.

आर्थिक सुविधा-

१. आर्थिकदृष्ट्या मागासलेले विद्यार्थी व ज्याचे वार्षिक उत्पन्न दोन लाखापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना राज्यसरकारकडून फी सवलत मिळेल. परंतु तसे आवेदनपत्र व संपूर्ण आवश्यक कागदपत्रांची पूर्तता व आवश्यक प्राधिकरणाची शिफारस आवेदनपत्रावर / सोबत असणे आवश्यक आहे त्याच प्रमाणे आवेदनपत्र दिलेल्या मुदतीत कार्यालयात जमा केले पाहिजे.

२. भारत सरकारची मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती योजना महाविद्यालयाकडून राबविली जाते. त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ प्राप्त होतो त्यांनी आपले आवेदनपत्र व त्यावर सक्षम अधिकाऱ्यांच्या शिफारसी तसेच सोबत जोडावयाची सर्व कागदपत्रे यांसह आवेदनपत्र निर्धारित केलेल्या वेळेत कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे. या योजनेअंतर्गत एस.सी., एस.टी., एस.बी.सी., ओ.बी.सी. या वर्गवारीतील विद्यार्थ्यांना लाभ घेता येईल. मात्र शिष्यवृत्ती फॉर्म भरल्यावर अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास शिष्यवृत्ती वसूल केली जाईल. सदरची संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाईन आहे.

३. केंद्र सरकारची राज्यशासनामार्फत राबविली जाणारी अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना महाविद्यालयाकडून राबविली जाते. ज्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ प्राप्त होतो त्यांनी आपले आवेदनपत्र व त्यावर सक्षम अधिकाऱ्यांच्या शिफारसी तसेच सोबत जोडावयाची सर्व कागदपत्रे यांसह आवेदनपत्र निर्धारित केलेल्या वेळेत कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे. या योजनेअंतर्गत मुस्लिम, बौद्ध, पारशी, जैन या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लाभ घेता येईल. त्यासाठी उत्पन्नाची मर्यादा आहे. तसेच वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांमधील अटीही लागू राहतील.

विद्यार्थ्यांसाठी इतर सुविधा:-

* विद्यार्थ्यांसाठी रुपये दोन लाखांपर्यन्त गटविमा योजना.
* अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी योजना.

* विविध स्पर्धा परीक्षांसाठी समुपदेशन व मार्गदर्शन.

* गरीब विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्कात सवलत तसेच विनामूल्य वह्या आणि पुस्तके .

* शुल्क आकारून संगणक शिक्षण, प्रशिक्षण, प्रमाणपत्र कोर्सेस.

* मुंबई विद्यापीठाकडील अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आर्थिक मदत म्हणून शिष्यवृत्ती.

शिष्यवृत्तीसाठीचे फॉर्म भरण्यासाठी विविध वेबसाईटस आहेत या वेबसाईटवर विद्यार्थ्यांनी फॉर्म भरावे.

1. https://mahadbt.maharashtra.gov.in/
2. https://scholarships.gov.in/fresh/loginPage

<u>आदिवासी प्रगती मंडळ, तलासरी</u>

सोसायटी रजिस्ट्रेशन कायदा 1960 नुसार सोसायटी रजिस्टर असून रजिस्टर क्र. बॉम्बे / 8 / 1961 दिनांक 3 ऑक्टोबर 1961 आहे. त्याचप्रमाणे सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम 1950 नुसार संस्था नोंदणीकृत आहे. नोंदणी क्र. E-1052-ठाणे दि. 21/05/1990 आहे. कॉम्रेड एल. एस. कोम यांच्या खंबीर नेतृत्वातून ही संस्था निर्माण झालेली आहे. मा. एल. एस. कोम यांनी कॉम्रेड शामराव परुळेकर व कॉम्रेड गोदावरी परुळेकर यांच्या प्रेरणेतून या भागातील आदिवासी व गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून विद्यार्थी वसतिगृहाने शैक्षणिक कार्यास सुरवात करण्यात आली. माविद्यालयाची प्रथम उधवा येथे स्थापना केली. तालुक्यातील सर्व गावातील व पंचक्रोषितील विध्यार्थांना सोयीचे व्हावे यासाठी तलासरी येथे मध्यवर्ती ठिकाणी कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर महाविद्यालय स्थलांतरित केले. तलासरी येथे मुला-मुलींचे वसतिगृह, उधवा येथे मुलांचे वसतिगृह, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालय, वसा येथे माध्यमिक आश्रमशाळा, कोचाई येथे आश्रमशाळा, तलासरी येथे कनिष्ठ महाविद्यालय, माध्यमिक शाळा व इंग्रजी माध्यमाची शाळा, आशागड येथे माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविदयालय, वरवाडा आणि वेवजी येथे माध्यमिक विद्यालय अशा शैक्षणिक शाखा सुरु होऊन संस्थेचा वटवृक्ष वाढतच चालला आहे.

<u>संस्थेचे शैक्षणिक उपक्रम :</u>

उच्च शिक्षण : कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, तलासरी

कला शाखा : स्थापना 22 जून 1994

मुंबई विद्यापीठ संलग्न नॅक कडून' बी+' श्रेणी मानांकित(3rd Cycle)

कला शाखा वर्ग विस्तारीकरण- : स्थापना 14 जुलै 2010

वाणिज्य विद्याशाखा----------: स्थापना 14 जुलै 2010

विज्ञान विद्याशाखा ---------- : स्थापना 30 ऑगस्ट 2011

कला शाखा विषय-विस्तारीकरण-: विस्तारीकरण वर्ष 2013-14, शासन मान्यता दि. 10 जुलै 2013

पदव्युत्तर शिक्षण- : एम.ए. :स्थापना दिनांक 10 जुलै 2013

: एम.कॉम. : स्थापना दिनांक 10 जुलै 2013

**संगणक शिक्षण**: महाविद्यालयीन विध्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण मिळावे म्हणून संस्थेने कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सर्व विध्यार्थ्यांसाठी संगणक शिक्षण त्याचबरोबर संगणक प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. त्यासाठी पुरेसे संगणकसंच व नियमित विद्युत पुरवठा असलेली स्वतंत्र दोन संगणक प्रयोगशाळा उपलब्ध करून दिलेल्या आहेत .

सन 2014-15 या वर्षांपासून कोणताही एक संगणक प्रशिक्षण कोर्स विद्यार्थ्यांना अनिवार्य केला आहे .

**मुक्त उच्च शिक्षण** : परिसरातील उच्चशिक्षणापासून उपेक्षित असलेल्या विद्यार्थ्यांनाही उच्च शिक्षण मिळावे म्हणून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नासिक यांचेकडील बी. ए./ बी.कॉम. हे पदवी अभ्यासक्रम तर बी.लिब. आणि एम.ए. हा तर पदवीत्तर अभ्यासक्रम कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर महाविद्यालय, तलासरी येथे सुरु करण्यात आलेला आहे .

**रोजगार:** या भागातील विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगार आणि नोकरीच्या संधी उपलब्ध होण्यासाठी स्वयंरोजगार केंद्र कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर महाविद्यालय तलासरी येथील ग्रंथालयात सर्व स्पर्धापरीक्षेसाठी लागणारी पुस्तके, संदर्भ ग्रंथ व विविध प्रकारची मासिके / पाक्षिके उपलब्ध करून देण्यात येतात. त्याचप्रमाणे अनुभवी मार्गदर्शक उपलब्ध करून दिले जातात . रोजगार व स्वयंरोजगारासाठी संपर्क केंद्र स्थापन करून परिसरातील औद्योगिक क्षेत्रामध्ये कामगार / कारागीर / कर्मचारी / पोलीस व तत्सम जागेसाठी महाविदयालयातून भारतीप्रकिया केली जाते. स्वयंरोजगाराच्या संधीसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचेकडील अंगणवाडी/बालवाडी सेविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच बचतगट स्वयंसेवक /स्वयंसेविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम असे उपयुक्त अभ्यासक्रम महाविद्यालयातून चालविले जातात.

महाविदयालयातील विविध विभाग-

१. परीक्षा विभाग
२. राष्टीय सेवा योजना विभाग
३. सांस्कृतिक विभाग
४. जिमखाना व क्रीडा विभाग
५. स्पर्धा पारीक्षा मार्गदर्शन व समुपदेशन विभाग
६. महिला विकास कक्ष
७. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ , अभ्यासकेंद्र
८. संगणक शिक्षण व प्रशिक्षण केंद्र

## दृष्टिकोन

आदिवासी व दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षाणासंबंधी तसेच त्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी विशेष मौलिक सेवा व औपचारिक माहिती देणे.

## मिशन

१. तलासरी व पंचक्रोशीतील गरजू, दारिद्र्य रेषेखालील आदिवासी विध्यार्थ्यांच्या शिक्षणासंबंधी विशेष कार्य करणे.

२. आदिवासी समाज व त्या समाजाची प्रगती यासाठी प्रयत्न करून भौतिक सुविधांची उपलब्धता करून देणे.

३. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा, दैनंदिन उपस्थिती या बाबतीतील उच्च व नैतिक तत्वाचे अवलंबन करणे व त्यांच्या मनावर बिंबवणे.

४. विद्‌यार्थ्यांसाठी अभ्यासेत्तर उपक्रम राबविणे उदा. सांस्कृतिक, क्रीडा व राष्टीय सेवा योजना विभागामार्फत त्यांच्या व्यक्तिमत्व विकासा साठीचा सर्वांगीण विकास साधने.

५. विद्‌यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा व स्पर्धात्मक युगामध्ये आव्हान स्वीकारता यावे यासाठी त्यांना विविध संधीची जाणीव व उपलब्धता करून देणे.

ध्येय

१. कला, वाणिज्य, विज्ञान, माहिती व तंत्रज्ञान  तसेच कौशल्याधिष्टित अभ्यासक्रमाची संधी उपलब्ध करून देणे.

२. आदिवासी विध्यार्थ्यांना कायम नोकरी मिळावी यासाठी शासकीय सेवासंबंधीच्या स्पर्धात्मक परीक्षेबाबत समुपदेशन करणे.

३. महाविद्‌यालयातील आजी व माजी विद्‌यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मदत व प्रयत्न करणे.

४. दारिद्र्य रेषेखालील समाजाची उन्नती व्हावी यासाठी केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाच्या असलेल्यासुविधांसंबंधी जाणीव करून देणे व या योजनेतून लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.

५. विदयार्थी, शिक्षक, कर्मचारी, संस्था, सर्व समाजाची प्रगती व्हावी व राष्टभक्ती निर्माण व्हावीयासाठी मोलाचे योगदान देणे.

भविष्यावर दृष्टिक्षेप

- माहिती व तंत्रज्ञान व संगणकशास्त्र पदवी शिक्षण सुरु करणे.
- व्यवस्थापनाचे स्वयंचलित अभ्यासक्रम नव्याने सुरु करणे.
- संगणक शिक्षणाचे सुरु असलेले अल्पकालीन शिक्षण कायम करणे.
- अल्पमुदतीचे विविध कौशल्याधिष्टित अभ्यासक्रम नियमित करणे.
- कार्यरत असलेल्या Language Lab सुधारणा करणे व त्याची व्याप्ती वाढविणे.
- वाणिज्य शाखेसाठी प्रयोगशाळा तयार करणे.
- विज्ञान शाखेतील पदव्युत्तर पदवी.

## अभ्यासक्रम

= कला शाखेतील स्नातक पदवी (तीन वर्षाचा एकात्मिक अभ्यासक्रम ) B.A. Three Years integrated Degree Course

= वाणिज्य शाखेतील स्नातक पदवी (तीन वर्षाचा एकात्मिक अभ्यासक्रम) B.Com. Three Years integrated Degree Course

= विज्ञान शाखेतील स्नातक पदवी (तीन वर्षाचा एकात्मिक अभ्यासक्रम ) B.Sc. Three Years integrated Degree Course

= कला शाखेतील पदव्युत्तर पदवी (दोन वर्षाचा अभ्यासक्रम ) M.A. Two Years integrated Degree Course

= वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी (दोन वर्षाचा अभ्यासक्रम ) M.Com. Two Years integrated Degree Course

= यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र M.A., B.Lib., B.A., B.Com.,

= वारली चित्रकला प्रमाणपत्र अभ्यासक्रम

= संगणक प्रशिक्षण केंद्र- कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी संगणकाशी निगडीत विविध कोर्सेस

## ग्रंथालय विभाग

तलासरी येथील कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हे पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. महाविद्यालयाने सतत गुणवत्तेची कास धरल्याने अल्पावधीतच महाविद्यालय नावारूपाला आले . महाविद्यालयाने सतत निकालाची परंपरा उज्वल ठेवली आहे . त्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक त्या शैक्षणिक सुविधांच्या देवाण घेवाण प्रक्रियेचा लाभ झाला आहे.

महाविद्यालयीन ग्रंथालय हे खालील पाच तत्वावर आधारित आहे.

१ पुस्तके/ग्रंथ हे वाचण्यासाठी आहेत.

२ प्रत्येक वाचकाचे ते पुस्तक आहे.

३ प्रत्येक पुस्तकाला वाचक मिळाला पाहिजे.

४ वाचकाचा वेळ वाचला पाहिजे.

५ आपले ग्रंथालय हे एक अशी संघटना आहे ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या नैतिक व बौद्धिक वाढीची महत्वपूर्णभूमिका बजावली जाते. सर्वांच्या सोयीसाठी ग्रंथालय हे कार्यालयाला लागून तळमजल्यावर स्वतंत्र विंग आहे. ग्रंथालय कार्यालयीन वेळेत आठ तास खुले असते . ग्रंथालयाचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी प्राचार्यांच्या नेतृत्वाखाली सल्लागार समिती स्थापन करण्यात आलेली आहे. समिती संपूर्ण ग्रंथालय कामकाजासंबंधी काम पाहते. विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी ग्रंथालयीननियमांचा काटेकोरपणे वापर केला जातो. ग्रंथालयाच्या कामकाजासाठी दिनदर्शिका सूचना फलकावर लावलेली आहे. वाचकांना आपल्या ग्रंथालयीन संपत्तीचा माहितीसाठी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुस्तक पेढी योजनेचा लाभ घेण्यासाठी पुस्तकांच्या प्रदर्शनाचे आयोजण केले जाते.

ग्रंथालयामध्ये पुस्तकांची रचना ड्यूई डेसिमल क्लासिफिकेशन Due Desimal Classification या शास्त्रीय वर्गीकरणानुसार केलेली आहे . तसेच प्रत्येक पुस्तकाला अनुक्रम हा - या पध्दतीनुसार देण्यात आला आहे.ही पद्धत जगभर सर्वत्र प्रमाणित मानली जाते. फाईल्स व रजिस्टर यांच्या याद्या व्यवस्थित अनुक्रमे भरलेल्या आहेत.प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या शेवटी ग्रंथालयामध्ये जमा पुस्तकांची पडताळणी केली जाते.गरजेनुसार ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना कामे वाटून दिली जातात . ग्रंथपालाला स्वतःला अद्यावत ज्ञान मिळवण्यासाठी परिसंवाद कार्यशाळा यांच्या माध्यमातून संधी दिली जाते.

ग्रंथालयात इंटरलोन फॅसिलिटी असल्याने अंतर्गत इतर सार्वजनिक वाचनालयाच्या संपर्कात राहता येते . ग्रंथालय हे संपूर्णपणे संगणकीकृत केलेले आहे. ग्रंथालयाच्या दैनंदिन कामात गती यावी यासाठी सोल स्वाफ्टवेअर खरेदी केलेले असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्वयंचलित भाग आहे.

ग्रंथालयाचे स्थळ - ग्रंथालय हे महाविद्यालयाच्या इमारतीच्या प्रवेशाच्या पश्चिमेस तळ मजल्यावर असून त्याचे क्षेत्रफळ २००० स्वे.फू. आहे ग्रंथसंग्रह योजना प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विषय शिक्षकांनी व विभागप्रमुखांकडून पुस्तके नियतकालिकांची मागणी यादी व आवश्यक्तेनूसारची मागविली जाते.त्यानंतर ही यादी ग्रंथालय समितीसमोर मान्यतेसाठी मांडण्यात येते व त्यास मान्यता घेण्यात येते. ही मान्यता मिळाल्यानंतर पुन्हा एकदा ग्रंथालयात ती पुस्तके नसल्याची खात्री केली जाते व मागणीनुसार प्रकाशक व लेखकांच्या पुस्तकांची खरेदी केली जाते .

पुस्तके विद्यार्थ्यांना देतानाच नियम:-

= पुस्तके बदलतांना वर्गावर दिवस व वेळेचे बंधन पाळले जाते.

= पुस्तकातील कार्डावर नोंद ही ग्रंथालय करील, विद्यार्थ्याने पुस्तकातील कार्डावरील कोणतीही नोंद करू नये.

= पुस्तके काळजीपूर्वक हाताळावीत, पुस्तकामध्ये कोणतेही चित्रे रंगवू नये अथवा पेनाने वा पेन्सिलीने खुणा करू नये.

= विद्यार्थ्यांनी फोटो दिल्याशिवाय त्याला ग्रंथालय कार्ड दिले जाणार नाही.

= ग्रंथालय कार्ड हरविल्यास कार्डाची रक्कम वसूल करून नवीन कार्ड देण्यात येईल.

= प्रत्येक पुस्तक सात दिवसाच्या आत जमा करावे त्यापेक्षा उशिर झाल्यास प्रत्येक दिवसाला रु 1/- किंवा 2/- याप्रमाणे दंड आकाराला जाईल व तो वसूलही केला जाईल.

= विद्यार्थ्यांनी पुस्तके घेतांना नीट पडताळून पाहावे. ते जर फाटलेले किंवा पानाची कमतरता असलेले किंवात्यातील पाने फाडलेली असतील तर ती लगेचच ग्रंथालयाच्या निदर्शनास आणावी.

= पुस्तके जमा करतांना ती तपासून घेतली जातील. ते जर फाटलेले किंवा पानाची कमतरता असलेले किंवात्यातील पाने फाडलेली असतील तर नियमाप्रमाणे दंड करण्यात येईल अथवा संपूर्ण पुस्तकाची रक्कमही वसूल करण्यात येईल.

= जर विद्यार्थ्यांकडून पुस्तक हरविले असेल तर त्या पुस्तकाची पूर्ण रक्कम वसूल करण्यात येईल.

= वाचन कक्षात खालील पुस्तके ही ओळखपत्रावर देण्यात येतील ही पुस्तके घरी वाचण्यासाठी देण्यात येणार नाही

१. संदर्भ पुस्तके   २. दुर्मिळ पुस्तके   ३. प्रश्नपत्रिका संच

४.मासिके   ५.कमी प्रती असलेले व जास्त मागणी असलेले पुस्तक

= प्रत्येक विद्यार्थ्याने ग्रंथालयाचे नियम व वेळोवेळी झालेले बदल पाळणे बंधनकारक आहे.

=जो पर्यंत ग्रंथालयातील संपूर्ण पुस्तके जमा केलेले नसतील तोपर्यंत विद्यार्थ्यास परीक्षेचे हॉल तिकीट/निकाल दिला जाणार नाही.

=ग्रंथालयात शांतता पाळा. तसेच शारिरीक डिस्टन्स पाळणे व मास्क लावणे, सॅनिटायझर चा वापर करणे इत्यादी मिळणा-या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

= विद्यार्थ्याने ग्रंथालयात प्रवेश करतांना आपल्यासोबत पादत्राणे, छत्री, काठी, बॅग, रेनकोट, तेलकट पदार्थ,पाळीव प्राणी राहणार नाहीत याची काळजी घ्यावी त्यासाठी ग्रंथालयाबाहेर प्रापर्टीरूम असून तेथे आपण ती आपल्या जबाबदारीत ठेवावी.

= प्रत्येक विद्यार्थ्याने इ-मेल आय.डी. प्रवेश घेतेवेळी ग्रंथालयास द्यावा.

**सेवा व विविध उपक्रम:-**

अभ्यासकक्ष / वाचनकक्ष काऊंटर

पुस्तके / नियतकालिके देवाण - घेवाण काऊंटर

मागणीनुसार पुस्तकांचा शोध

ताब्यात घेतलेल्या व मागणी असलेल्या पुस्तकांची यादी

पुस्तके घरी वाचण्यासाठी देणारे काऊंटर

**संदर्भ विभाग:-**

संदर्भासाठी आवश्यक असलेली पुस्तके , ग्रंथ व ग्रंथेतर साहित्य नियमाप्रमाणे व उपलब्धतेनुसार दिले जाते.

**चालू घडामोडीची माहिती:-**

विषयासंदर्भातील व अगदी ताजी अद्यावत माहिती प्रथम प्राध्यापकांना दिली जाते. त्यांच्या मार्फत विद्यार्थ्यांना दिली जाते व ही माहिती नोटीस बोर्डवरही लावण्यात येते . त्या शिवाय विद्यार्थ्यांना हवी असलेली माहिती वेळेनुसार उपलब्ध करून देण्यात येते.

ग्रंथालयातील उपक्रम :

१. पुस्तक पेढी योजना - या योजनेअंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुस्तके पुरविली जातात .ही पुस्तके त्यांना वर्षभर घरी

वाचण्यासाठी दिली जातात . साधारणपणे ही सर्व पुस्तके ही अभ्यासक्रमाची असतात .

२. पुस्तक प्रदर्शन - ग्रंथालयामार्फत प्रत्येक वर्षी पुस्तकांचे प्रदर्शन भरविले जाते.

३. विदयार्थ्यांच्या सूचना स्वीकारणे - विदयार्थी हा मुख्य वाचक असल्याने त्याच्या प्रत्येक सूचना ग्रंथालयात स्वीकारल्या जातात.

सूचना :- ग्रंथालय आवेदन पत्र ( Membership form ) प्रवेश घेताना त्वरित जमा करावा. अन्यथा प्रवेश प्रक्रिया पूर्ण होणार नाही .

## महाविद्यालयीन विकास समिती

| | |
|---|---|
| मा. डॉ. एम. आय. पटेल | मा. ए. बी. नार्वेकर |
| मा.एच. टी. गोंदिया | मा. आर. एस. राणे |
| मा. आर. के. कु-हाडा | मा. सुहास सुरती |

## अद्यापन विभाग

प्रा.डॉ.बी.ए.राजपूत प्राचार्य

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मराठी विभाग | → | प्रा.डॉ.बी.ए.राजपूत | प्रा.संदिप वावरे | प्रा. रंजना शनवार |
| इंग्रजी व मानसशास्र | → | प्रा.वाकडे डी.एस | प्रा.पंडित | |
| अर्थशास्त्र विभाग | → | प्रा.माळवदकर एम. पी. (व्यवसायकि अर्थशास्त्र) | | प्रा.रामेश्वर हंबर्डे |
| इतिहास विभाग | → | प्रा.डॉ.पवार आर .एन. | प्रा.गोतीस बी.ई. | |
| राज्यशास्त्र विभाग | → | प्रा. अभय ओझरे | प्रा. कु. अनवरी खान | |
| ग्रंथालय विभाग | → | प्रा.डॉ. होन ए. के. | श्री. बरफ एम. आर. | श्री. झरेकर एस.एम. |
| वाणिज्य विभाग | → | प्रा.साळवे एन.एस. | | |
| लेखाशास्त्र विभाग | → | प्रा.रितेश रायचना | | |
| रसायनशास्त्र विभाग | → | प्रा.माने व्ही.ए | प्रा.शेफाली गहाला | प्रा. हर्षाली दुबला |
| | | प्रा.अमोल दबडे | | |
| भौतिकशास्त्र विभाग | → | प्रा.रितेश हटकर | प्रा.दिलीप पागी | |
| वनस्पती शास्त्रविभाग | → | प्रा.डॉ.सचिन राऊत | प्रा. सुजाता गावित | |
| प्राणीशास्त्रविभाग | → | प्रा. डॉ. कमलेश माळी | | |
| गणितविभाग | → | प्रा. लव्हारे | प्रा. सागर गावित | प्रा. वानखेडे |
| व्यवसायिक कायदे | → | प्रा. ॲड. राहुल मोहिले | | |

## शिक्षकेत्तर कर्मचारी

| | | |
|---|---|---|
| श्री.शेख एम. आय | श्री. पाटील जे.एम. | श्री.भोये के.के. |
| श्री. खुलात व्ही. एच. | श्री.एम. एस. मुऱ्हा | श्री. दौडा जे. ए. |
| श्री.खटाणे एन.बी. | श्री.बरफ एम.आर. | श्री.आर.बी. गीते |
| श्री.झरेकर एस.एम | श्री.कालात के.एल. | श्री.खेडकर के.एम |
| श्री. एस.डी. राजपूत | श्री. राजेश भुरकूड | श्री. अषिश दॊडा |
| श्री.विजय मंडल | सौ.दीपा भुरकूड | |

COLLEGE PROFILE

## About COM. GODAVARI SHAMRAO PARULEKAR COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE, TALASARI

The realization of our greatest social worker Comrade Godavari Shamrao Parulekar's dream to see Tribal Zone as a centre of excellence in education was initiated by our Hon. Chairman Com. L. S. Kom with the establishment of Com. G. S. P. College of Arts, Commerce and Science, Talasari in the year 1994. The very name of college reminds us of com. Godavari Parulekar who devoted her life for the holistic upliftment of Tribal and to bring them into the mainstream of development. Earlier college building was located there at Udhawa but for the easy convenience of the Tribal students coming from all direction to receive education. The Hon. President has been a ceaseless source of inspiration for us whereas Principal Dr. B. A. Rajput is nurturing the very college with all his capacities. The college is also a recipient of the prestigious 'Best College Award' for the year 2014-2015 of the University of Mumbai.

Its objective is to bring tribals into mainstream and core for their entire progress and development. In this college today all the faculties including Arts, Commerce and Science are being taught for the academic conveniences of tribal students living nearby Talasari. As is mentioned earlier, the very intention behind opening this college was to impart qualitative education and to offer valuable service in the field of education to all with a special focus on tribal and BPL students. Its mission was to attain communal and social development through developing infrastructural facilities of the institution, to inculcate the values of discipline, regularity, sincerity and punctuality amongs students so as to make them better citizen. It is also striving hard to make all round development of the personality of students through extracurricular activities, and finally to make aware the students for opportunities available and challenger to be faced in the competitive world so as to make full utilize of their potentials the college is having well planned campus affiliated to University of Mumbai and was 3$^{rd}$ Cycle accredited with grade "B+" in 2017. The college has centralized library equipped with rich and versatile collection of books and well qualified and experienced faculty members. The college has run National University students skill Development (NUSSD) Courses and Career Guidance and Counseling Programmes by Professional Experts. To impart knowledge to the semi - educated students, college is running the centre of Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik. The college has also won NSS Best Unit Award. It is a great honor for the college as our Principal Dr. B. A. Rajput received an 'Indian Leadership Award for Education Excellence' in 2014 by all India Achievers Foundation, Delhi. The College has started Post Graduation in M.A History and M.COM. Since 2013-14 the three storied elegant building of the college gives evidence of its grandeur and ever increasing hunger of knowledge.

Comrade Godavari ShamraoParulekar College of Arts, Commerce and Science, TalasariDist-Palghar 401606

Fees for the Year 2022-23 Class- **B.A. and B.Com.**

| Sr. No. | | Particular | First Year | Second Year | Third Year |
|---|---|---|---|---|---|
| A) | 1 | Tuition Fee | 800 | 800 | 800 |
| | 2 | Laboratory Fee | 0 | 0 | 0 |
| | 3 | Library Fee | 200 | 200 | 200 |
| | 4 | Gymkhana Fee | 200 | 200 | 200 |
| | 5 | Other Fee /Extra Curricular Activities | 250 | 250 | 250 |
| | 6 | Enrolment Fee | 220 | 00 | 00 |
| | 7 | Admission Processing | 00 | 00 | 00 |
| | 8 | Document Verification Fee | 00 | 00 | 00 |
| | 9 | Utility Fee | 250 | 00 | 00 |
| | 10 | Magazine Fee | 100 | 100 | 100 |
| | 11 | Identity / Library Card | 50 | 50 | 50 |
| | 12 | Group Insurance | 40 | 40 | 40 |
| | 13 | Student Welfare fund | 50 | 50 | 50 |
| | 14 | Development Fund | 500 | 500 | 500 |
| | 15 | Vice-Chancellor Fund | 20 | 20 | 20 |
| New | 16 | University Sport and Cultural Activities | 400 | 400 | 400 |
| | 17 | E-Charge Fee /E-seva/Disaster 20+50+10 | 80 | 80 | 80 |
| | | | 3160 | 2690 | 2690 |
| | Only Those Student Who are Registered in Computer Lab | | | | |
| B) | 18 | Computer Practical Fee | 00 | 00 | 00 |
| | 19 | Computer Laboratory Fee | 00 | 00 | 00 |
| C) | Refundable | | | | |
| | 20 | Caution Money | 00 | 00 | 00 |
| | 21 | Library Deposit | 00 | 00 | 00 |
| | 22 | Computer Laboratory Deposit | 00 | 00 | 00 |
| D) | Other Fees to be charge if on Demand | | | | |
| | 23 | Transcript Fee | 1000 | 00 | 00 |
| | 24 | Admission Form + Prospectus +Boucher | 100 | 100 | 100 |
| | 25 | Transfer Certificate Fee | 00 | 00 | 100 |
| | 26 | Bonafide Certificate (on Demand) | 20 | 20 | 20 |
| | 27 | No Objection Certificate (on Demand) | 20 | 20 | 20 |
| | 28 | Industrial Visit Fee (If Planed) | 500 | 500 | 500 |
| | 29 | Project Fee ( if project be compulsory) | 500 | 500 | 500 |
| | | | | | |

| | |
|---|---|
| Convocation | RS.250 only for Third Year |
| Examination Fee | Rs.**1050** Per Term/ Exam |
| **B.A. Non-Grantable Division Tuition Fee will be Rs.3000** | |

Comrade Godavari ShamraoParulekar College of Arts, Commerce and Science, TalasariDist-Palghar 401606

Fees for the Year 2022-23 Class- **B. Sc.**

| Sr. No. | | Particular | F. Y. B.Sc. | S. Y. B.Sc. | T. Y.B. Sc. |
|---|---|---|---|---|---|
| A) | 1 | Tuition Fee | 800 | 800 | 800 |
| | 2 | Laboratory Fee | 600 | 600 | 600 |
| | 3 | Library Fee | 200 | 200 | 200 |
| | 4 | Gymkhana Fee | 200 | 200 | 200 |
| | 5 | Other Fee /Extra Curricular Activities | 250 | 250 | 250 |
| | 6 | Enrolment Fee | 220 | 00 | 00 |
| | 7 | Admission Processing | 00 | 00 | 00 |
| | 8 | Document Verification Fee | 00 | 00 | 00 |
| | 9 | Utility Fee | 250 | 00 | 00 |
| | 10 | Magazine Fee | 100 | 100 | 100 |
| | 11 | Identity / Library Card | 50 | 50 | 50 |
| | 12 | Group Insurance | 40 | 40 | 40 |
| | 13 | Student Welfare fund | 50 | 50 | 50 |
| | 14 | Development Fund | 500 | 500 | 500 |
| | 15 | Vice-Chancellor Fund | 20 | 20 | 20 |
| | 16 | University Sport and Cultural Activities | 400 | 400 | 400 |
| | 17 | E-Charge Fee /E-seva/Disaster 20+50+10 | 80 | 80 | 80 |
| | | | 3760 | 3290 | 3290 |
| | Only Those Student Who are Registered in Computer Lab | | | | |
| B) | 18 | Computer Practical Fee | 00 | 00 | 00 |
| | 19 | Computer Laboratory Fee | 00 | 00 | 00 |
| C) | Refundable | | | | |
| | 20 | Caution Money | 00 | 00 | 00 |
| | 21 | Library Deposit | 00 | 00 | 00 |
| | 22 | Computer Laboratory Deposit | 00 | 00 | 00 |
| D) | Other Fees to be charge if on Demand | | | | |
| | 23 | Transcript Fee | 1000 | 00 | 00 |
| | 24 | Admission Form + Prospectus +Boucher | 100 | 100 | 100 |
| | 25 | Transfer Certificate Fee | 00 | 00 | 100 |
| | 26 | Bonafide Certificate (on Demand) | 20 | 20 | 20 |
| | 27 | No Objection Certificate (on Demand) | 20 | 20 | 20 |
| | 28 | Industrial Visit Fee (If Planed) | 500 | 500 | 500 |
| | 29 | Project Fee ( if project be compulsory) | 500 | 500 | 500 |
| | | | | | |
| Convocation | | RS.**250** only for Third Year | | | |
| Examination Fee | | Rs.**1050**Per Term/ Exam | | | |

Comrade Godavari ShamraoParulekar College of Arts, Commerce and Science, TalasariDist-Palghar 401606

Fees for the Year 2022-23 Class- **M.A. / M.Com.**

| Sr. No. | | Particular | MA-I | M.A.-II | M. Com.-I | M. Com.-II |
|---|---|---|---|---|---|---|
| A) | 1 | Tuition Fee | **3000** | **3000** | **6000** | **6000** |
| | 2 | Laboratory Fee | **0** | **0** | **0** | **0** |
| | 3 | Library Fee | **1000** | **1000** | **1000** | **1000** |
| | 4 | Gymkhana Fee | **200** | **200** | **200** | **200** |
| | 5 | Other Fee /Extra Curricular Activities | **250** | **250** | **250** | **250** |
| | 6 | Registration Fee | **1025** | **0** | **825** | **0** |
| | 7 | Admission Processing | **200** | **200** | **200** | **200** |
| | 8 | Document Verification Fee | **400** | **0** | **400** | **0** |
| | 9 | Utility Fee | **250** | **250** | **250** | **250** |
| | 10 | Magazine Fee | **100** | **100** | **100** | **100** |
| | 11 | Identity / Library Card | **50** | **50** | **50** | **50** |
| | 12 | Group Insurance | **40** | **40** | **40** | **40** |
| | 13 | Student Welfare fund | **50** | **50** | **50** | **50** |
| | 14 | Development Fund | **500** | **500** | **500** | **500** |
| | 15 | Vice-Chancellor Fund | **20** | **20** | **20** | **20** |
| | 16 | University Sport and Cultural Activities | **30** | **30** | **30** | **30** |
| | 17 | E-Char /E-seva/Disr/Ashwa 20+50+10+20 | **100** | **100** | **100** | **100** |
| | | | **7215** | **5790** | **10015** | **8790** |
| | Only Those Student Who are Registered in Computer Lab | | | | | |
| B) | 18 | Computer Practical Fee | **500** | 500 | 1500 | 1500 |
| | 19 | Computer Laboratory Fee | **400** | 500 | 0 | 0 |
| C) | Refundable | | | | | |
| | 20 | Refundable Deposit | **0** | **0** | **0** | **0** |
| | 21 | Caution Money | **0** | **0** | **0** | **0** |
| | 22 | Library Deposit | **0** | **0** | **0** | **0** |
| | 23 | Computer Laboratory Deposit | **0** | **0** | **0** | **0** |
| D) | Other Fees to be charge if on Demand | | | | | |
| | 24 | Transcript Fee | | | | |
| | 25 | Admission Form + Prospectus +Boucher | **100** | **100** | **100** | **100** |
| | 26 | Transfer Certificate Fee | **0** | **100** | **0** | **100** |
| | 27 | Bonafide Certificate (on Demand) | **20** | **20** | **20** | **20** |
| | 28 | No Objection Certificate (on Demand) | **20** | **20** | **20** | **20** |
| | 29 | Industrial Visit Fee (If Planed) | | | | |
| | 30 | Project Fee (Where ever applicable ) | **2000** | **2000** | | |
| | | | | | | |

Disaster Relief Fund- Rs.**10** to All Examination Fee Rs.**1500** Per Term/ ExamConvocation RS.**250** only Part-2

## Class Wise Group of Subjects कला विद्याशाखा बी.ए .

| Class | Group Code | Group Subjects | | | Compulsory Subject | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| FYBA (A) | 011001 | Political Science - I | History –I | Marathi -I | Communication Skill- I | Marathi (C) | Foundation Course –I |
| FYBA (B) | 011002 | English - I | Psychology – I | Economics - I | Communication Skill- I | Marathi (C) | Foundation Course –I |

FYBA साठी वरील दोन ग्रुप पैकी फक्त एकाच ग्रुपची विद्यार्थ्याला निवड करावयाची आहे.

| Class | Group Code | Group Subjects | | | Compulsory Subject | |
|---|---|---|---|---|---|---|
| SYBA (A) | 013001 | Political Science – II &III | History – II&III | Marathi – II &III | Foundation Course -II | ADVERTISING (APPLIED) |
| SYBA (B) | 013002 | English – II &III | Psychology – II & III | Economics – II &III | Foundation Course -II | BUSINESS COMMUNICATION |

**FYBA** साठी वरील दोन ग्रुप पैकी जो एक ग्रुप निवडलेला होता त्याच ग्रुपमध्ये विद्यार्थ्याला **SYBA** मध्ये प्रवेश मिळणार असल्याने **SYBA** साठी **FYBA** अभ्यास केलेल्या ग्रुपचीच निवड करावयाची आहे.

| Class | Group Subjects | |
|---|---|---|
| TYBA (A) | Marathi and Political Science | Marathi and History |
| TYBA (B) | English and Economics | English and Psychology |

**FYBA आणि SYBA** साठी वरील दोन ग्रुप पैकी जो एक ग्रुप निवडलेला होत्या त्याच ग्रुपमधील कोणतेही दोन विषयात विद्यार्थ्याला **TYBA** मध्ये प्रवेश मिळणार असल्याने **SYBA** साठी **FYBA** अभ्यास केलेल्या ग्रुपधील कोणत्याही दोन विषयाची निवड करावयाची आहे .

**आपण निवडलेल्या विषयांची नांवे खालील पैकी कोणते आहे हे विषय शिक्षकांकडून समजावून घ्यावे.**

1. History of Medieval Marathi Literature - IV (97002)
2. Indian and Western Theories of Literature - V (97032)
3. Literature and Society - VI (97067)
4. World Politics (97019)
5. Western Political Thought (97051)
6. Politics of Modern Maharashtra (97087)
7. History of Meieval India (1000 CE-1526 CE) (97017)
8. History of Modern Maharashtra (1818 CE-1960 CE) (97047)
9. Introduction to Archaeology (97084)
10. 16th to 18th Century English Literature - I (97001)
11. Literary Criticism - I (97031)
12. Grammar and Art of writing - I (97064)
13. Psychological Testing and Staristics-I-IV (97021)
14. Abnormal Psychology - V (97053)
15. Industrial and Organisational Psychology - VI (97090)
16. Microeconomics III (97016)
17. Economics of Developement (97046)
18. Economics of Agriculture and Cooperation (97082)

**Class Wise Group of Subjects** **वाणिज्य विद्याशाखा बी .कॉम.**

| Class | Group Code | Subjects | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FY BCom | 021 001 | Accountancy and Financial Management - I | Commerce - I (Business Development) | Business Economics - I | Business Communication - I | Environmental Studies - I | Mathematical and Statistical Techniques - I | Foundation Course –I |
| SY BCom | 023 001 | ACCOUNTANCY AND FINANCIAL MANAGERMENT - II | FINA. ACCOU. & AUDITING - INTRODUCTION TO MANAGEMENT ACCOUNTING | COMMERCE-III | BUSINESS ECONOMICS - III | ADVERTING | FOUNDATION COURSE - III | BUSINESS LAW – I |
| TY BCom Sem V | 2C 00145 | Direct & Indirect Taxation Paper I (23115) | Export Marketing Paper I (23116) | Business Economics V (23113) | Commerce V (23114) | Financial Accounting and Auditing VII - Financial Accounting (23101) | Financial Accounting and Auditing VIII - Cost Accounting (23107) | |
| TY BCom Sem VI | 2C 00146 | Direct and Indirect Taxation Paper II (83015) | Export Marketing Paper II (83016) | Business Economics VI (83013) | Commerce VI (83014) | Financial Accounting and Auditing IX - Financial Accounting (83001) | Financial Accounting and Auditing X - Cost Accounting (83007) | |

Class Wise Group of Subjects विज्ञान विद्याशाखा बी. एस्सी. FYBSC

FYBSC दोन ग्रुप मधून कोणताही एक ग्रुप निवडता येईल

ग्रुप एक - CBZ C-रसायनशास्त्र ,B-वनस्पतीशास्त्र Z- प्राणीशास्त्र

ग्रुप दोन - PCM या ग्रुपसाठी एचएससी मध्ये गणित विषय असणे आवश्यक आहे.

P -भौतिकशास्त्र ,C -रसायनशास्त्र ,M -गणित

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ग्रुप एक-CBZ<br>Group Code<br>031001 | **Foundation Course - I** | **Chemistry Theory - I** | **Chemistry Theory – II** | **Botony Theory - I** |
| | **Botony Theory - II** | **Zoology Theory - I** | **Zoology Theory - II** | |
| ग्रुप दोन-PCM<br>Group Code 031002 | **Foundation Course - I** | **Chemistry Theory - I** | **Chemistry Theory - II** | **Physics Theory - I** |
| | **Physics Theory - II** | **Mathematics - I** | **Mathematics - II** | |

---

Class Wise Group of Subjects विज्ञान विद्याशाखा बी .एस्सी . SYBSC

SYBSC पाच ग्रुप मधून एक ग्रुप निवडायचा आहे

FYBSC ला जो एक ग्रुप निवडलेला होता त्याच ग्रुपमधील विषय निवडायचे आहे .

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ग्रुप एक-CB | CHEMISTRY PAPER-I<br>BOTANY PAPER-I | CHEMISTRY PAPER-II<br>BOTANY PAPER-II | CHEMISTRY PAPER-III<br>BOTANY PAPER-III | **Foundation Course – II** |
| ग्रुप दोन-PM | PHYSICS PAPER-I | PHYSICS PAPER-II | PHYSICS PAPER-III | **Foundation Course – II** |
| | MATHEMATICS PAPER-I | MATHEMATICS PAPER-II | MATHEMATICS PAPER-III | |
| ग्रुप तीन-CP | CHEMISTRY PAPER-I | CHEMISTRY PAPER-II | CHEMISTRY PAPER-III | **Foundation Course – II** |
| | PHYSICS PAPER-I | PHYSICS PAPER-II | PHYSICS PAPER-III | |
| ग्रुप चार-Bz | BOTANY PAPER-I | BOTANY PAPER-II | BOTANY PAPER-III | **Foundation Course – II** |
| | ZOOLOGY PAPER- I | ZOOLOGY PAPER-II | ZOOLOGY PAPER-III | |

Class Wise Group of Subjects विज्ञान विद्याशाखा बी .एस्सी .TYBSC

SYBSC ला जो एक ग्रुप निवडलेला होता त्याच ग्रुप मधील एक विषय निवडायचा आहे.

| | | |
|---|---|---|
| ग्रुप एक- | Horticulture and Gardening - I (USACHO501) | Practical of USACHO501 (USACHO5P1) |
| | Plant Diversity III (24205) | Plant Diversity IV (24220) |
| | Form and Function III (24236) | Current Trends in Plant Sciences II (24267) |
| | Practicals based on USBO501 and USBO502 (USBOP5) | Practicals based on USBO503 and USBO504 (USBOP6) |
| ग्रुप दोन- | Drugs and Dyes (USACDD501) | Practical Based on USACDD501 (USACDD5P1) |
| | Analytical Chemistry (24212) | Inorganic Chemistry (24227) |
| | Organic Chemistry (24243) | Physical Chemistry (24255) |
| | Practical of USCH501 and USCH502 (USCHP05) | Practical Of USCH503 and USCH504 (USCHP06) |
| ग्रुप तीन- | Multivariable Calculus II (24215) | Linear Algebra (24231) |
| | Topology of Metric Spaces (24246) | Numerical Analysis I (24260) |
| | Practicals based on USMT503 and USMT5A4/ USMT5B4/ USMT5C4/ USMT5D4 (USMTP06) | Practicals based on USMT501 and USMT502 (USMTP05) |
| | Computer Programming and System Analysis (USACCA501) | Practical Based on USACCA501 (USACCA5P1) |

विषयांच्या खात्रीसाठी विषय शिक्षकांना भेटावे .



MS-CIT
REDMI K20 PRO
AI TRIPLE CAMERA


REDMI K20 PRO
AI TRIPLE CAMERA




# Library and Reading Room








3
CHEMISTRY LAB. I







2
CHEMISTRY LAB. II




PHYSICS LAB.



MSC-IT **संगणक केंद्र सुविधा**



**नविन संगणक सुविधा Computer Facility**


LANGUAGE LAB.
COMPUTER LAB.
भाषा प्रयोगशाळा आणि
संगणक प्रयोगशाळा
8
संगणक कक्ष




29
ZOOLOGY LAB.




BOTANY LAB.



# BOTONICAL GARDEN





BOTONICAL GARDEN

# Conference Hall Students Meet Hall










Open Stage for Various Programe



# पिण्याचे शुध्द पाणी




वर्ष दुसरे
भविष्यवेधी नेतृत्व
मा. उदय सामंत
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने
MITSC
करिअर कट्टा
युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....
आयएएस आपल्या भेटीला
• राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/ महाराष्ट्र लोकसेवा आयोग
• पोलीस भरती
• बँकिंग सेवा
• स्टाफ सिलेक्शन कमिशन
• केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु पी एस सी)
उद्योजक आपल्या भेटीला
• उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
• व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन
• वित्त व्यवस्थापन
• निर्णय क्षमता
• जोखीम व्यवस्थापन (Risk Management)
• मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन
• आधुनिक तंत्रज्ञान
ध्येयपूर्तीच्या वाटेवर सातत्याने ३६५ दिवस
यासोबत सभासद शुल्क ₹ ३६५/-भरल्यानंतर विद्यार्थ्यांना ०३ वर्ष प्रति वर्ष ०५ या पद्धतीने १५ कोर्स मोफत दिले जातील.
Subscribe me
नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी
7507652555 या नंबरवर आपले नाव करा
https://careerkatta.mitsc.co.in
SCAN ME

| Course List | |
|---|---|
| 1) Python Programming | 26) Digital Banking |
| 2) Python for AI/ML | 27) Digital Marketing |
| 3) Python for web Development | 28) Political Ethics and Value |
| 4) Cloud computing | 29) Leadership Development |
| 5) Devops | 30) Literacy about Judicial Process |
| 6) Data analytics with tableau and power BI | 31) Constitutional Values and Ethics |
| 7) Social Media Profile Management | 32) Certificate in Office Administration |
| 8) Financial Literacy | 33) Certificate in Training Management |
| 9) Event Management | 34) Organic Farming |
| 10) Fund Flow Management | 35) Fruits and Vegetables Drying Dehydration and Technology |
| 11) Communication Skill & Personality Development | 36) Certificate course in World Politics |
| 12)बी पी टी १९५० संस्था नोंदणी कायदा प्रशिक्षण | 37) Certificate course in Rural Development |
| 13) Road Safety and Awareness Training | 38) Scientific Temperament |
| 14) परदेशी नोकरीच्या संधी आणि व्यक्तिमत्व विकास | 39) Green Chemistry |
| 15) Foundation Course in Business Law | 40) Renewable Energy |
| 16) माहिती अधिकार कायदा प्रशिक्षण | 41) Nanotechnology |
| 17) Soft Skill Training Program | 42) Biotechnology |
| 18) Certificate Course in Human Right | 43) Medical Lab Technology |
| 19) Certificate Course in Journalism | 44) Nano Biotechnology |
| 20) Communication Skill Program | 45) Introduction to Forensic Science |
| 21) Content Writing Course | 46) Tourism Management |
| 22) Basic of Cost & Works Accounting | 47) Forensic Accounting |
| 23) E- Filling | 48) Cyber Law |
| 24) Soft Skill Development | 49) Office Management |
| 25) Introduction to Basic Concept of Accounting | 50) Consumer Protection Act 2019 |

# करिअर कट्टा विद्यार्थी नोंदणी फॉर्म

1) नाव :- ..............................................................................................

2) शिक्षण :- ...................................

3) ई-मेल आयडी :-..............................................................................

4) मोबाईल नंबर :

5) महाविद्यालयाचे नाव :- ......................................................................

.......................................................................................................

6) महाविद्यालयाचा कोड :- .....................................

7) करिअर कट्टा कोर्सचे नाव :-

- IAS आपल्या भेटीला
- उद्योजक आपल्या भेटीला

8) जिल्हा :- .....................................

9) तालुका :- ..............................

10) विद्यार्थ्यांची सही :- ...................................